दाखल दिनांक : ०१.०६.२०१५
नोंदविल्याचा दिनांक : ०१.०६.२०१५
निकाल दिनांक : ०३.०७.२०२६
कालावधी : ११ व.०१म.०२दि

**न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, न्यायालय क्र. १, पाथर्डी यांचे न्यायालयात**

(पीठासीन अधिकारी – रविकिरण सपाटे)

**नियमित फौजदारी खटला क्र. १३९/२०१५** **निशाणी क्रमांक – ५७**

गुन्हा नोंद भाग २ क्र.२४/२०१४, पाथर्डी पोलीस ठाणे, जि. अहमदनगर

**अभियोग पक्ष** **महाराष्ट्र शासन**,
मार्फत – पोलीस निरीक्षक,
पाथर्डी पोलीस ठाणे, जि. अहमदनगर

प्रतिनिधीत्व : सहाय्यक सरकारी वकील श्री. ए. बी. विधाटे.

**आरोपी** १. **निवृत्ती मारुती खेडकर**,
वय– ७१ वर्षे, धंदा– शेती

२. **अनुसया निवृत्ती खेडकर(मयत)**

३. **आजिनाथ निवृत्ती खेडकर,**
वय – ४२ वर्ष, धंदा –शेती,

क्र. १ व ३ रा. मुंगूसवाडे ता. पाथर्डी जि. अहमदनगर.

प्रतिनिधीत्व : विधीज्ञ श्री.आर. एन. खेडकर.

## भाग–ब

(फौजदारी आदेशिकेचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(ii) अन्वये)

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | १८.०७.२०१४ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | १८.०७.२०१४ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | ०१.०६.२०१५ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | :– | १८.०६.२०२४ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :– | ०९.०७.२०२५ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :– | –– |
| न्यायनिर्णय दिनांक | :– | ०३.०७.२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | :– | –– |

## आरोपींची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याची दिनांक | गुन्ह्याचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | निवृत्ती मारुती खेडकर | ०२.०१.२०१५ | ०२.०१.२०१५ | भा.दं.वि.कलम २९४, ३२३, ५०४, ५०६, सह ३४ अन्वये. | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ३. | आजिनाथ निवृत्ती खेडकर | | | | | | |

## न्यायनिर्णय

## (पारित दिनांक ०३ जुलै, २०२६)

१. आरोपींविरुध्द पाथर्डी पोलीस ठाणे भाग २ गु.र.नं.२४/२०१४, भारतीय दंड

विधान संहिता, १८६० चे कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ खालील गुन्हयांसाठी फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे प्रकरण १९ अन्वये वॉरंट खटल्याप्रमाणे संपरिक्षा घेण्यात आली.

२. **अभियोग पक्षाची थोडक्यात हकीगत अशी की,**

फिर्यादी सुलाबाई सुर्यभान खेडकर यांनी दि.१८.०७.२०१४ रोजी पाथर्डी पोलिस स्टेशन येथे फिर्याद दिली की, त्या दिवशी ती शेतामध्ये काम करत असताना सकाळी ११.०० वाजण्याच्या सुमारास, त्यांच्या शेतावरील बांधावरील दगड उपटलेला दिसला म्हणून त्यांच्या शेताशेजारील आरोपी निवृत्ती यांना बांधावरून दगड कसा काय उपटला असे विचारले असता त्याचा राग सर्व आरोपींना आला व त्यांनी तिला शिवीगाळ करुन हिला जास्त झाले आहे हिचे गांडीत मिरची भरा असे आरोपी निवृत्ती शिवीगाळ करुन आजिनाथ व अनुसया यांनी तिचे हात धरुन खाली पाडुन लाथाबुक्क्यांनी मारहाण करत होते. त्यावेळी फिर्यादीचे पती सुर्यभान हे सोडविणेसाठी मध्ये आले असता त्यांना आरोपी निवृत्ती व आजिनाथ यांनी शिवीगाळ करुन लाथाबुक्क्यांनी मारहाण केली व २४ तासाच्या आत जिवे मारु अशी धमकी दिली. त्यावेळी प्रकाश बाबासाहेब खेडकर व सुधाकर दिनकर खेडकर यांनी येवून सोडवासोडव केली.

३. फिर्यादीने दिलेल्या फिर्यादवरुन पाथर्डी पोलीस ठाणे भाग २ गु.र.नं.२४/२०१४, भारतीय दंड विधान संहिता, १८६० चे कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास पो. हे. कॉ. आर. के. रांझणे यांच्याकडे देण्यात आला. त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदवले, घटनास्थळ पंचनामा तयार केला व जखमींचे वैद्यकिय प्रमाणपत्र हस्तगत केले आणि तपास पूर्ण झाल्यानंतर आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

४. मी आरोपींविरुध्द नि.१७ कडे दोषारोप ठेवला आहे. दोषारोपातील मजकुर

आरोपींना त्यांच्या भाषेत वाचून दाखविला असता, आरोपींनी गुन्हा नाकबुल करुन संपरीक्षा घेण्याची मागणी केली.

५. तसेच, आरोपींचे फौजदारी व्यवहार संहिता, १९७३, कलम ३१३(१)(ब) चे निवेदन निशाणी ५४ व ५५ अन्वये नोंदविण्यात आले. आरोपींनी खोटी केस दाखल केल्याचा बचाव घेतला आहे.

६. खटला निर्णित करणेसाठी माझ्यासमोर खालील मुद्दे उपस्थित झाले. त्यांचे निष्कर्ष मी खालील दिलेल्या कारणमिमांसेवरुन पुढीलप्रमाणे नोंदवित आहे.

| **अ.क्र.** | **वादप्रश्न** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | दि. १८.०७.२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजेच्या सुमारास मौजे मुंगुसवाडे, ता. पाथर्डी, जि. अहमदनगर येथे फिर्यादीच्या शेतामध्ये आरोपींनी संगनमत करुन इतरांना त्रास होईल अशा प्रकारे अश्लील शब्द उच्चारले, हे अभियोग पक्ष सिध्द करतो काय ? | नाही. |
| २. | वर नमुद वेळेस व ठिकाणी आरोपी यांनी संगनमत करुन फिर्यादी व साक्षीदाराला मारहाण करून इच्छापुर्वक दुखापत पोहचवली, हे अभियोग पक्ष शाबीत करतो का ? | नाही. |
| ३. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीच्या हातुन सार्वजनिक शांततेचा भंग व्हावा किंवा एखादा फौजदारीपात्र गुन्हा घडावा या उद्देशाने त्यांना शिवीगाळ करुन अपमानित केले, हे अभियोग पक्ष शाबीत करतो का ? | नाही. |
| ४. | वर नमुद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी संगनमत करुन फिर्यादीला फौजदारीपात्र धाकदपटशा केला व जिवे मारण्याची | नाही. |

| | | |
|---|---|---|
| | धमकी दिली, हे अभियोग पक्ष शाबीत करतो का ? | |
| ५. | काय आदेश ? | अंतिम आदेशाप्रमाणे |

**– का र ण मि मां सा –:**

**मुद्दे क्र. १ ते ४ करीता –**

७. वरील सर्व मुद्दे एकमेकांशी सलंग्न असल्याने विवेचन व पुराव्याची पुनरावृत्ती टाळण्याकरीता त्यांचे विश्लेषण एकत्रीत करण्यात येत आहे.

८. सा.क्र.१ फिर्यादी सुलाबाई यांनी सरतपासात असे अभिकथन केले आहे की,आरोपी शेजारी असल्याने त्यांना ओळखतात. घटना दि. १८.०७.२०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता त्यांच्या शेतामध्ये घडली होती. त्या शेतात काम करत असताना बांधावरील दगड उपटला होता. त्यांनी आरोपी क्र. १ याला दगड कोणी उपटला असे विचारले. परंतु त्याने भांडणे काढली व म्हणाला की, हिला जास्त झालय. त्यावेळेस आरोपी आजिनाथ म्हणाला की, हिला खाली पाडून मिरची भरा. आरोपींनी त्यांना खाली पाडले. अनुसयाने त्यांचे हात धरले होते. आरोपींनी त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण व हिला जिवे मारा अशी धमकी दिली. त्यानंतर त्यांचे मालक आले. त्यांच्या मालकांना देखिल आरोपींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. त्यानंतर प्रकाश बाबासाहेब व सुधाकर दिनकर यांनी त्यांना सोडविले. त्यानंतर त्यांनी पोलिस स्टेशनला फिर्याद नि ३० दिली.

९. सा. क्र. ०१ सुलाबाई यांनी उलटतपासामध्ये मान्य केले आहे की, आरोपी हे त्यांचे भाउबंध आहेत व त्यांच्यासोबत ब–याच वर्षापासून जमिनीच्या बांधावरुन वाद आहेत. ज्या जमिनीचा दगड उपटला त्याचा गट नंबर ती सांगू शकत नाही.

१०. सा. क्र. ०२ आबासाहेब व सा. क्र. ०३ बाळासाहेब दोन्ही घटनास्थळ पंच यांनी त्यांनी त्यांच्या पंचनाम्यावरील सहया अनुक्रमे निशाणी ३२ व ३४ ओळखल्या. परंतु

घटनास्थळ पंचनामा पोलिसांनी त्यांच्या समक्ष केल्याचे नाकारुन घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूर त्यांना माहित नसल्याचे कथन केले आहे. तसेच सा. क्र. ०४ सुधाकर व सा. क्र. ०५ प्रकाश यांनी फिर्यादी ही त्यांची चुलती असल्याचे कथन केले आहे. परंतु घटना कधी, कोठे व काय घडली हे त्यांना माहित नसल्याचे सांगितले आहे. वरील चारही साक्षीदार यांना अभियोग पक्षामार्फत उत्तरसुचक प्रश्न विचारले परंतु अभियोग पक्षास पुरक असा पुरावा पटलावरती आलेला नाही.

११. सा. क्र. ०६ तपासी अधिकारी रांझणे यांनी सरतपासामध्ये अभिकथन केले आहे की, सन २०१४ साली ते पाथर्डी पोलीस स्टेशन येथे पोलीस हेड कॉन्स्टेबल म्हणुन कार्यरत असताना दिनांक १८/०७/२०१४ रोजी दिवशी त्यांच्याकडे गु.र.क्र. २४/२०१४ भा.दं.वी.कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ चा तपास देण्यात आला होता. तपासाकरीता त्यांच्याकडे फिर्याद, दैनिक अहवाल व प्रथम खबरी अवालाची प्रत देण्यात आली होती. त्यानंतर घटनास्थळी जाऊन दोन पंचांसमक्ष घटनास्थळ पंचनामा नि ५१ तयार केला.त्यानंतर साक्षीदारांकडे चौकशी करुन त्यांचे जबाब नोंदविले. त्यानंतर त्यांनी गुन्हयातील आरोपींना हजर राहण्याबाबत नोटीस दिली. तपासाअंती आरोपीने गुन्हा केल्याचे निष्पन्न झाल्यामुळे त्यांनी त्यांच्याविरूध्द न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

१२. सा. क्र. ०६ रांझणे यांनी उलटतपासामध्ये साक्षीदार सुधाकर व प्रकाश यांचे जबाबातील नि ५५ व ५६ नोंदविले नसल्याचे नाकारले आहे.

१३. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी युक्तीवाद केला की, फिर्यादी तसेच साक्षीदार यांनी दिलेल्या पुराव्यावरुन आरोपींनी गुन्हा केल्याचे निष्पण्ण होते. उलटपक्षी आरोपींच्या विधिज्ञांनी युक्तीवाद केला की, जमिनीच्या वादातून त्यांच्याविरुध्द खोटी केस दाखल केलेली आहे. वास्तविक पाहता तशी कोणतीही घटना घडलेली नाही.

१४. वास्तविक पाहता अभियोग पक्षाला भारतीय दंड संहिता कलम २९४ प्रमाणे गुन्हा शाबित करणेकरीता घटनेचे ठिकाण हे सार्वजनिक ठिकाण आहे हे शाबित करणे गरजेचे आहे.

परंतु, प्रस्तुत प्रकरणामध्ये अभियोग पक्षाने घटनास्थळ पंचनामा शाबित केलेला नाही. फिर्याद निशाणी ३० याचे अवलोकन केले असता घटनास्थळ हे फिर्यादी व आरोपी यांच्या शेताच्या बांधावरती आहे. त्यामुळे निश्चितच सदरचे ठिकाण हे सार्वजनिक ठिकाण नाही. तसेच फिर्यादी हिने आरोपींनी कोणती अश्लील शब्द किंवा शिवी उच्चारली होती याबाबत कोणताही पुरावा सरतपासामध्ये दिलेला नाही.

१५. फिर्यादीच्या हकिकतीनुसार, तिला व तिच्या पतीला आरोपी यांनी लाथाबुक्क्यांनी मारहाण करुन जिवे ठार मारणेची धमकी दिली त्यावेळेस सा. क्र. ०४ सुधाकर व सा. क्र. ०५ प्रकाश यांनी त्यांना सोडविले. दोन्हीही साक्षीदार हे फिर्यादीचे पुतणे आहेत. परंतु, त्यांनी घटना कधी, काय व कोठे घडली हे त्यांना माहित नसल्याबाबत पुरावा देवून अभियोग पक्षाला दुजोरा दिलेला नाही. तसेच घटनेतील फिर्यादीचे पती यांना तपासण्यास देखिल अभियोग पक्ष असफल ठरले आहे. फिर्यादीने आरोपी व त्यांच्यामध्ये ब–याच वर्षापासून जमिनीचे वाद असल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे या सर्वांचा एकंदरीत विचार करता अभियोग पक्षाच्या हकिकतीवरती संशय निर्माण होतो व त्याचा फायदा आरोपींना देणे योग्य व उचित होईल. त्यामुळे अभियोग पक्ष आरोपी यांनी मयत आरोपी क्र. ०२ अनुसया हिच्याशी संगनमत करुन सार्वजनिक ठिकाणी अश्लील शब्द उच्चारून फिर्यादी व साक्षीदार यांना इच्छापुर्वक दुखापत पोहोचवली, अपमानित करुन शिवीगाळ केली व जिवे मारण्याची धमकी दिली या बाबी रास्तपणे शाबित करणेस अपयशी ठरले आहे. त्यामूळे मी मुद्दे क्र. १ ते ४ यांचे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र. ५ करीता–</u>**

१६. माझे वरील विवेचनावरुन तसेच मुद्दे क्र.१ ते ४ यांचा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला असल्याने अभियोग पक्ष आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ अन्वये निश्चित केलेले दोषारोप सर्व संशयाच्या पलीकडे जावून शाबीत करण्यास अपयशी ठरले आहे. अशा परिस्थितीत आरोपींना संशयाचा फायदा देऊन निर्दोष मुक्त करणे योग्य व उचित होईल. करीता मी मुद्दा क्र. ५ च्या उत्तरार्थ खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत

आहे.

## आदेश

१. आरोपी क्र. १ व ३ यांची भारतीय दंड संहिता कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सह ३४ नुसार शिक्षेस पात्र गुन्ह्यातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपी क्र. १ व ३ यांचे वैयक्तिक जातमुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. आरोपी क्र. १ व ३ यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ अन्वये प्रत्येकी रक्कम रुपये ७,५००/– चे वैयक्तिक बंधपत्र व तितक्याच रक्कमेचा स्वतंत्र जामीन सादर करावा. सदरचे बंधपत्र हे पुढील सहा महिन्यांकरता वैध राहिल.

(निकाल खुल्या न्यायालयात घोषित करणेत आला.)

RAVIKIRAN VITTHAL SAPATE

Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2026.07.03 17:23:47 +0530

पाथर्डी.

दिनांक – ०३/०७/२०२६

**(रविकिरण सपाटे),**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

पाथर्डी.

**भाग–क**

(फौजदारी आदेशिकेचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४(iii) अन्वये)

अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांचेतर्फे तपासण्यात आलेल्या साक्षीदारांची यादी

**अ. अभियोग पक्ष**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | सुलाबाई सुर्यभान खेडकर | फिर्यादी | निशाणी २९ |
| २. | आबासाहेब नवनाथ खेडकर | घटनास्थळ पंच | निशाणी ३१ |
| ३. | बाळासाहेब भगवान खेडकर | घटनास्थळ पंच | निशाणी ३३ |
| ४. | सुधाकर दिनकर खेडकर | साक्षीदार | निशाणी ३६ |
| ५. | प्रकाश बाबासाहेब खेडकर | साक्षीदार | निशाणी ३७ |
| ६. | रेवन्नाथ कारभारी रांझणे | तपासी अधिकारी | निशाणी ५० |

अभियोग पक्ष/बचाव पक्ष/न्यायालय यांचेतर्फे निशाणी देण्यात आलेल्या कागदपत्रांची यादी

**अ. अभियोग पक्ष**

| अ.क्र. | निशाणी क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी ३०/साक्षीदार क्र.१ | फिर्याद |
| २. | निशाणी ३२/साक्षीदार क्र.२ | घटनास्थळ पंचनामावरील सही |
| ३. | निशाणी ३४/साक्षीदार क्र. ३ | घटनास्थळ पंचनामावरील सही |
| ४. | निशाणी ५१/साक्षीदार क्र. ६ | घटनास्थळ पंचनामा |
| ५. | निशाणी ५२ व ५३/साक्षीदार क्र. ६ | साक्षीदार क्र.४ सुधाकर दिनकर खेडकर व साक्षीदार क्र. ५ प्रकाश बाबासाहेब खेडकर यांचे जबाबातील साक्षांकित भाग अ |

**भाग–ड**

**महत्त्वाच्या वस्तु – निरंक**

RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Digitally signed by RAVIKIRAN VITTHAL SAPATE
Date: 2026.07.03 17:23:53 +0530

पाथर्डी.

दिनांक – ०३/०७/२०२६

**(रविकिरण सपाटे),**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,

पाथर्डी.

**प्रमाणपत्र**

मी अधिकथन करते की, या पी. डी. एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णयामधील शब्द–नि–शब्द हे मूळ न्यायनिर्णयाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | रोहिणी आमटे |
| न्यायालयाचे नाव | : | रविकिरण सपाटे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पाथर्डी |
| न्यायनिर्णयाची तारीख | : | ०३/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयावर पीठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केल्याची तारीख | : | ०३/०७/२०२६ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याची तारीख | : | ०३/०७/२०२६ |